
पेद्रो आणि पाद्री

मेक्सिकोची लोककथा

मराठी:
अश्विनी बर्वे



पेद्रो आणि पाद्री

मेक्सिकोची लोककथा

मराठी: अश्विनी बर्वे





"पेद्रो, तू अजिबात काम करत नाही! त्याचे वडील त्याला रागावले. "जेव्हा जेव्हा मी पाहतो तेव्हा तू कुदळ घेऊन नुसता उभा राहिलेला असतो." दोघेजण चवळीच्या शेतात काम करत होते. नेहमीसारखेच पेद्रो मुलाने करावे तितकेही काम करत नव्हता.


पेद्रोच्या वडिलांनी म्हटले, "मी फार निराश झालो आहे. पेद्रो तू दुसरीकडे जाऊन काम करायला पाहिजे. कदाचित एखाद्या अनोळखी माणसाकडे तू काम करायला शिकशील."




आणि याच आशेने की तो कुठे ना कुठे काम शोधेल,दुसऱ्या दिवशी सकाळी त्याला घराच्या बाहेर पाठवले. दिवसभर तो धूळ भरलेल्या रस्त्याने चालत राहिला. संध्याकाळी तो एका गावात पोहचला. त्याचवेळी एक पाद्री छोट्याशा चर्चमधून बाहेर येत होते. पेद्रो त्यांच्याकडे गेला आणि म्हणाला, “इथे कुठे राहायला जागा मिळू शकते का?”

पाद्रींनी पेद्रोकडे निरखून बघितले. एक चांगला मजबूत शरीरयष्टीचा तो तरुण होता. त्याचा चेहरा खोडकर आणि डोळे काळे होते. त्यांनी विचारले, “तू घरातून पळून आला आहेस का?”








“नाही, पेद्रो म्हणाला. “मी पेद्रो दे उड़्देमालिस आहे. मी शेतकऱ्याचा मुलगा आहे. पण मी त्या कोल्हयाचा मुलगा हे ज्याला कळपातून काढून दिलं आहे. माझ्या वडिलांनी सांगितलं की मला दुसरीकडे काम शोधावे लागेल.”

“इथे खूप काम आहे जे तू करू शकतो,” पाद्री म्हणाले. “मी तुला पैसे तर देऊ शकत नाही पण तू माझ्या घरात राहू शकतो आणि माझ्याबरोबर जेऊ शकतो.”

“धन्यवाद,” पेद्रो म्हणाला, “तुम्ही सांगाल ते काम मी करेन.”



पाद्रीच्या मागे मागे तो चर्चच्या जवळ त्यांच्या घरात आला. काम मिळाल्याने तो खुश होता.


कितीतरी दिवस पेद्रो पाद्री च्या घरात राहिला आणि त्यांच्या बागेत आणि चर्चमध्ये काम करत राहिला. त्याचे आवडते काम होते चर्चची घंटी वाजवणे. पहिली घंटा तो सगळ्यांना उठवण्यासाठी वाजवत असे.मग गावातल्या लोकांना तयार होण्यासाठी वेळ मिळत असे. मग तो त्यांना चर्चमध्ये बोलावण्यासाठी दुसरी घंटा वाजवत असे.


पेद्रोला घंटेची दोरी पकडून लटकायला आवडत असे. टण टण, टण, टण! पण जर त्याने दोरी जोरात खेचली तर घंटा टॅन टू करत असे. तेव्हा त्याला समजे की घंटा अडकली आहे आणि शिडीवर चढून त्याला घंटाघरात जावं लागे आणि घंटा सरळ करावी लागे.

वरती घंटाघरात वटवाघळे असत. पेद्रोला त्यांची भीती वाटे. पण जेव्हा तो घंटा अशी बंद करे तेव्हा गाववाले त्याची चेष्टा करत असत. त्यांना माहीत होते की पाद्रीने कधी असे केलेले नाही.

एका रविवारी सकाळी जेव्हा पाद्रीने पहिली घंटा वाजवण्यासाठी पेद्रोल उठवले तेव्हा त्याने परत डोळे बंद करण्याची चूक केली. दुसऱ्या वेळी जेव्हा तो जागा झाला तेव्हा पाद्री त्याला दुसऱ्या वेळेची घंटा वाजवण्यासाठी उठवत होते. पेद्रोने घंटा वाजवली.








जेव्हा कोणी चर्चमध्ये आले नाही तेव्हा पाद्रीने विचारले, “पेद्रो, तू पहिली घंटा वाजवली होती का? काय वाजवली होती ना?”

“हो, हो!” पेद्रोने म्हटले. “पण मला वाटते की कोणी गाववाले उठले नाही.”

दोन स्त्रिया विहिरीकडे जात होत्या, त्या तिकडून गेल्या. तेव्हा पाद्री म्हणाले, “तू घंटा वाजवली नाही, तू माझ्याशी खोटं बोलला.”

“मला क्षमा करा,” पेद्रो म्हणाला. “मी आता कधी खोटं बोलणार नाही.”



मग एक दिवस पाद्री आपल्या गाढवावर बसून वस्तीतल्या आजारी लोकांना भेटायला गेले. जाण्याच्या आधी त्यांनी पेद्रोल मक्याच्या शेतात निंदणी करायला आणि तण काढण्याचे काम सांगितले.

पण खूप ऊन होते. पाद्री डोळ्याआड गेले नाही तोच पेद्रो गोंदामात जाऊन झोपला. ती दुपारची आरामाची वेळ नव्हती तरीही तो झोपला.



जेव्हा पाद्री आले तेव्हा त्यांनी पेद्रोला झोपलेले बघितले. त्यांनी त्याला उठवले आणि म्हटले, “तू शेत निंदले का नाही?

“मी निंदले होते,” पेद्रो म्हणाला. “गवत परत उगवले असेल. उन्हाळ्यात वेगाने उगवते.” “पेद्रो पेद्रो! पाद्री ओरडले. “हे खूप मोठे खोटे आहे! तू खोटं बोलायला कुठे शिकला?”

“एक पुस्तकातून,” पेद्रो म्हणाला.





“तू पुस्तकातून खोटं बोलायला शिकला?” पाद्रीनी चिडून विचारले.

“हो,” पेद्रो म्हणाला. “त्याच्या मुखपृष्ठावर लिहलेले होते, खोटं कसे बोलायचं! जर तुम्ही तुमचे गाढव मला दिले तर मी ते पुस्तक तुमच्यासाठी घेऊन येतो.”

“माझे गाढव घेऊन जा आणि ते पुस्तक घेऊन ये,” पाद्री म्हणाले.

पेद्रो गाढवावर स्वार झाला. त्याचा लगाम धरला आणि ओरडला, “अर्र अर्र!” पण त्याने लगाम एवढा घट्ट धरला होता की गाढव आपल्या जागेवरून हलले सुद्धा नाही.






पेद्रोने पाद्रीला म्हटले, “तुमचे गाढव तसे येणार नाही,जर तुम्ही तुमची टोपी मला दिली तर त्याला कळेल की तुम्हीच त्याच्यावर बसले आहात.”

पाद्रीनी आपली रुंद टोपी पेद्रोला दिली. पेद्रोने टोपी घातली आणि गाढवावर स्वार झाला आणि निघाला.


काही अंतरावर गेल्यावर पेद्रोने गाढवाला म्हटले, “तुला असे वाटते का की असे कोणते पुस्तक आहे जे खोटं बोलायला शिकवते?

गाढवाने आपले कान मागेपुढे केले आणि म्हटले, “इई – अअअआ”



दुपारच्या वेळी तो एक विराण झोपडीच्या जवळ पोहचला. झोपडीजवळ एक काटेरी झाड होते आणि मागच्या बाजूला एक जुनी विहीर होती. पेद्रोने गाढवाला झाडाला बांधले. विहिरीजवळ असलेल्या एक गंजलेल्या बादलीत पाणी काढून त्याने ते गाढवाला प्यायला दिले.

मग पेद्रो झोपडीत आला आणि धुळीने भरलेल्या फरशीवर त्याने झोपून घेतले. लवकरच एक गाडीच्या आवाजाने त्याची झोप मोडली. आवाज करत गाडी थांबली.



पेद्रो उठून बसला. कोणीतरी येत होते! त्याने वाळूवर पायांचा आवाज ऐकला, खर्र खर्र खररम.

दरवाज्यात एक माणूस दिसत होता. तो मोठा आणि मजबूत होता, त्याने शेतकऱ्याचे कपडे घातलेले होते. पेद्रो तणाव-मुक्त झाला. आणि त्याला विकण्यासाठी आपल्याजवळ एखादी वस्तु आहे का हे शोधू लागला.

जेव्हा त्याने माणसाने विचारले, "तू या झोपडीत राहतो का?"

पेद्रोने उत्तर दिले, "नाही,पण ही माझी आहे. माझ्या पैशांच्या झाडाला पाणी देण्यासाठी मी आत्ताच आलो आहे."

"पैशांचे झाड!" तो माणूस मोठ्या आवाजात म्हणाला. "पैशांचे कधी झाड असते का?"

"माझे गाढव त्याला बांधलेले आहे," पेद्रो म्हणाला. मग तो बाहेर आला, त्याने बादली भरली आणि झाडाला पाणी देऊ लागला.

तो माणूस संशयाने बघत राहिला. "त्या झाडाला काटयांशिवाय काही दिसत नाही मला." तो म्हणाला.

“काटे?” पेद्रो ओरडला. “लक्ष देऊन बघा! खरंच त्या पैशांच्या कळ्या आहेत. मी खूप श्रीमंत होईल.”

त्या माणसाने लक्षपूर्वक झाडाकडे बघितले. “तू हे झाड मला विकतो का?” त्याने विचारले. “माझ्या गाडीतून मी ते घरी घेऊन जाईन.”

“खरंतर आत्ता मला पैसे पाहिजे आहेत,” पेद्रो म्हणाला. “मला शंभर पैसो द्या आणि हे झाड तुमचे.”


त्या माणसाने पेद्रोला पैसे दिले आणि मग झाड काढण्यासाठी तो खोदू लागला.



गाढव जितक्या वेगाने दूर जाऊ शकते तितक्या वेगाने पेद्रो तिथून निघाला. तो म्हणाला, “ तुझा विश्वास आहे का पैसे झाडाला उगवतात याच्यावर?”

गाढवाने आपले कान मागेपुढे हलवले. आणि म्हटले, “इइइ-अअअआ!”

पेद्रो इकडेतिकडे फिरत राहिला आणि त्या पैशांवर आपला खर्च भागवत राहिला. पण एक दिवस जेव्हा त्याच्याजवळचे पैसे संपले तेव्हा त्याने गाढवाचा कळप त्या रस्त्याने येतांना बघितलं. त्या व्यापाऱ्यांना विकण्यासाठी आपल्याजवळ काही आहे का याचा तो शोध घेऊ लागला.






एक मोठे बेडूक उन्हात बसला होता. पेद्रोने पाद्रीची टोपी त्याच्यावर फेकली. मग तो त्याच्याजवळ गेला आणि आपल्याकडचे उरलेले शेवटचे संत्रे सोलू लागला.

जेव्हा व्यापारी पेद्रोच्या जवळ पोहचले तेव्हा ते थांबले. ते एकमेकांशी बोलत होते. पेद्रो संत्र खात होता आणि त्याचे काही तुकडे टोपीच्या खाली सरकवत होता.

एका माणसाने विचारेल, “तू आपल्या टोपीला संत्रे खायला का घालत आहे?”

“याच्या खाली माझा जादूचा पक्षी आहे,” पेद्रो म्हणाला.





“जादूचा पक्षी? जादूचा पक्षी?” दोन माणसं बरोबर ओरडले.

“हो,” पेद्रो म्हणाला. “तो गप्पा मारतो,तो गातो,तो नाचतो.”

“जरा आम्हाला पण बघू दे त्या पक्ष्याला,” एक माणूस म्हणाला.

“नाही,” पेद्रो म्हणाला. “तो उडून जाईल.”

“तुला तो विकायचा आहे का?” दुसऱ्या माणसाने विचारले.

“माझे हृदय तुटेल,” पेद्रो म्हणाला. “पण आत्ता मला पैशांची गरज आहे. मला शंभर पैसो द्या आणि हा पक्षी तुमचा होईल.”

एका माणसाने पेद्रोला पैसे दिले आणि दुसऱ्याने टोपी उचलण्यासाठी हात पुढे केला.



““थांबा!” पेद्रो ओरडला. “जोपर्यंत मी दूर जात नाही तोपर्यंत त्याला टोपीच्या खालून बाहेर काढू नका, नाहीतर तो माझ्या मागे मागे येईल.”

जेवढ्या लवकर गाढव जाऊ शकत होते तितक्या वेगाने पेद्रो तिथून निघाला. तो म्हणाला, “तुझा विश्वास बसेल का जादूचा पक्षी असं काही असतं म्हणून?”

गाढवाने आपले कान मागेपुढे हलवले. ते म्हणाले, “इइइ-अअअआ!”

पेद्रो डोळ्यांसमोरून जाण्याच्या आधी जय माणसाने पक्षी विकत घेतला होता,त्याने आपला हात टोपीच्या खाली घातला. त्याच्या बोटांना बेडकाचे कातडे लागले.




“ओह!” त्या नीच माणसाला पकड.”

त्याचा साथीदार ओरडला, “अर्र अर्र!” आणि त्याने आपले गाढव जितक्या वेगाने पळवत येईल तेवढे पळवले. पहिल्या माणसाने टोपी घातली आणि आपल्या साथीदाराच्या मागेमागे गेला. ओझी घेतलेली गाढवे त्याच्यामागून चालू लागली.

त्या माणसांनी पेद्रोला पकडले, त्यांनी आपले पैसे हिसकावून घेतले आणि धान्याच्या जुन्या गोणीत त्याला बंद केले. मग ती गोणी त्यांनी पेद्रोच्या गाढवावर ठेवली आणि दोघे तिथून निघाले.





त्या रात्री त्यांनी नदीच्या किनाऱ्यावर आपले सामान टाकले. जय माणसाने बेडूक विकत घेतला होता,त्याने ती गोणी ज्यात पेद्रो होतो ती घेऊन किनाऱ्यावर आला. तो ती गोणी पाण्यात फेकणारच होता तेव्हा त्याचा साथीदार म्हणाला, “त्याला आत्ता पाण्यात बुडवू नको, सकाळी बुडवू. त्याला रात्रभर याबाबत चिंता करू डे.”


अशा तऱ्हेने पेद्रो थोड्यावेळासाठी वाचला. आणि तो चिंता करत राहिला.



तो परत परत देवाची प्रार्थना करत राहिला आणि म्हणाला, ”हे देवा, आज जर तू मला या संकटातून वाचवले तर मी परत कधीच खोटं बोलणार नाही.”

पेद्रो चुपचाप गोणीत पडून राहिला. जेव्हा त्याने त्या व्यापाऱ्यांचे धोरणे ऐकले तेव्हा तो रांगत जिथे जनावरे बांधले होते तिथे आला, आणि म्हणाला, “पैनचिटा ऐक.” ते त्याच्या गाढवाचे नाव होते.

त्याने आपले डोके हलवले आणि वास घेऊ लागला, हुह हुह हुह.



पेद्रो घसरत घसरत त्याच्याजवळ आला. मग त्याने गोणीचे एक टॉक गाढवाच्या तोंडात दिले. गोणीला धान्याचा वास येत होता.

पैनचिटाला धान्याचा वास आला, तो म्हणाला, “इइइ-अअअआ!”

पेद्रो घाबरला, पण व्यापारी घोरत पडले होते.

पैनचिटा गोणी चावू लागला आणि चावतच राहिला.

लवकरच गोणीला एवढे मोठे भोक पडले की पेद्रो आपला हात बाहेर काढू शकत होता. त्याने हात बाहेर काढून दोरीची गाठ सोडली. गोणी उघडली, पेद्रो मुक्त झाला.





पेद्रोने हळूच पाद्रीची टोपी परत घेतली. मग त्याने गाढव मोकळे केले आणि दोघे घराकडे निघाले. ते रात्रभर चालत राहिले. पहाटेच्या वेळी त्यांना आपले गांव दिसले.

पैनचिटा विसरून गेला की तो थकला होता आणि तो वेगाने चालू लागला. जसे ते पाद्रीच्या घरी पोहचले तसे पाद्री घराच्या बाहेर आले.

पैनचिटा पटपट त्यांच्याजवळ गेला आणि आनंदाने इइइ-अअअआ, इइइ-अअअआ करू लागला.



पाद्रीनी पुढे केलेला हात तो चाटू लागला.

तेव्हा पाद्री म्हणाले, “तर पैनचिटा, तू या खोडकर मुलाला परत घरी घेऊन आलास!”

पेद्रोने उत्तर दिले, “हो, आणि पाद्री सर,मी त्या पुस्तकाच्या शोधात आहे ज्याच्या मुखपृष्ठावर लिहलेले आहे, खरं कसे बोलायचे.”

पाद्रीनी बघितले की पेद्रोला आपण केलेल्या चुकीचा पश्चाताप होत आहे. “खूप चांगले,” ते म्हणाले. “आणि आता लोकांना उठवण्यासाठी घंटा वाजवायची वेळ झाली आहे.”



“मी आत्ता घंटा वाजवतो,” पेद्रो म्हणाला. तो गाढवावरून खाली उतरला आणि झटपट चर्चमध्ये गेला.

पेद्रोने घंटेची दोरी कसकन धरली आणि जोरात हलवू लागला. घंटा वाजली टन –टू .

बास गावातल्या लोकांना आणि घंटाघरातल्या वटवाघळाना कळले की पेद्रो घरी परत आला आहे.

समाप्त